**सध्या कर्ज घेण्याची प्रक्रिया खूपच किचकट आहे. यासाठी कर्जदाराला अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. बँकांमध्ये हेलपाटे घालावे लागतात. कर्जदारांची ही अडचण लक्षात घेऊन आता सरकारने ही प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचे ठरवले आहे. भारतीय रिझर्व्ह बँक गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी पेमेंट ॲप युपीआयसारखे युनिफाईड लेंडिंग इंटरफेस प्लॅटफॉर्म लॉन्च करण्याची घोषणा केली आहे.**




गेल्या वर्षी (ऑगस्ट २०२३), आरबीआयने फ्रिक्शनलेस क्रेडिट म्हणजेच सुलभ कर्ज देण्यासाठी तांत्रिक प्लॅटफॉर्मचा पायलट प्रोजेक्ट सुरू केला होता. एक वर्षाच्या पथदर्शी प्रकल्पादरम्यान, मध्यवर्ती बँकेने किसान क्रेडिट कार्ड कर्ज, डेअरी कर्ज, वैयक्तिक कर्ज आणि गृहकर्जावर लक्ष केंद्रित केले, ज्यांना जास्त मागणी आहे.




**ग्राहकांना काय फायदा होणार?**

आज बाजारात अनेक ॲप्स झटपट कर्ज देण्याचा दावा करताहेत. परंतु, यावर आरबीआयचे नियंत्रण खूपच मर्यादित आहे. या ॲप्सद्वारे अनेकदा ग्राहकांचा, कर्जदारांचा मानसिक छळ केल्याचा आरोप होतो. पण, जर आरबीआय युएलआय प्लॅटफॉर्मवरील ॲप्सवर थेट नजर ठेवणार असेल तर तेथे अनियमितता निश्चितच कमी होतील. तसेच या व्यासपीठामुळे विशेषतः ग्रामीण आणि लहान ग्राहकांसाठी कर्जाचे मूल्यांकन मोठ्या प्रमाणात सुलभ होईल.

युनिफाईड लेंडिंग इंटरफेसची रचना कर्जप्रक्रियेसाठी लागणारा वेळ आणि कागदी काम कमी करण्यासाठी करण्यात आली आहे. हे ओपन ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस (एपीआय) सह ओपन आर्किटेक्चर एकत्र करते. यामुळे, वित्तीय संस्था सहजपणे 'प्लग अँड प्ले' मॉडेलमध्ये समाविष्ट होऊ शकतात.

युएलआय ॲप आधार, ई-केवायसी, राज्य सरकारच्या जमिनीच्या नोंदी, पॅन प्रमाणीकरण आणि अकाउंट ॲग्रीगेटरसह विविध स्रोतांकडून डेटा संकलित करेल. ते दुग्ध सहकारी संस्थांकडील दुधाचा डेटा आणि घर किंवा मालमत्ता शोध डेटा यासारख्या सेवांशी देखील जोडले जाईल. यामुळे तुम्ही युपीआयमध्ये ज्याप्रमाणे फक्त तुमचा पिन टाकून पेमेंट करता, त्याच प्रकारे युएलआयमध्ये तुम्ही पात्र असल्यास, तुमचा पिन टाकून तुम्ही कर्ज घेऊ शकता.

युनिफाईड पेमेंट इंटरफेस एप्रिल २०१६ मध्ये लाँच करण्यात आले. ८ वर्षांच्या प्रवासात युपीआयने डिजिटल पेमेंटचे जग बदलून टाकले. आज संबंध देशभरात पानाच्या दुकानांपासून ते भाजीच्या स्टॉलपर्यंत, तुम्हाला क्युआर कोड स्कॅनर बसवलेले दिसताहेत. इतर अनेक देशांनीही भारताचे युपीआय मॉडेल स्वीकारले आहे. आता या यशाची पुनरावृत्ती करण्यासाठी युएलआयची संकल्पना राबवली जाणार आहे.

# उधाण आलेल्या उरण-करंजा समुद्रात गुजरातची बोट बुडाली

■ रायगड

**समुद्राला** उधाण आलेले असताना उरण-करंजा येथे एक बोट बुडाली. ही बोट गुजरातच्या हद्दीतील मासेमारी बोट असल्याचे सांगितले जात आहे. या बोट दुर्घटनेचे काही व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. सुदैवाने दुर्घटनाग्रस्त बोटीवरील सर्व सात खलाशांना वाचविण्यात यश आले आहे.

## सातही मच्छीमार बचावले

समुद्राचे पाणी थेट बोटीत शिरल्याने ही बोट बुडाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या दुर्घटनेची माहिती कळताच सीआयएसएफ आणि नौदलाच्या गस्त नौकेद्वारे बचावकार्य सुरू करण्यात आले. हेलिकॉप्टरही मागविण्यात आले. याच हेलिकॉप्टरच्या माध्यमातून या बोटीतील सर्व सात खलाशांना वाचविण्यात यश आले. या बोट दुर्घटनेचा व्हिडिओ सध्या समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये दुर्घटनाग्रस्त बोट समुद्राच्या पाण्यात हेलकावे खाताना दिसत आहे. तर काही लोक लाईफ जॅकेट घालून दुर्घटनाग्रस्त बोटीतील मच्छीमारांना वाचवताना दिसत आहेत. आता वादळी हवामानामुळे बंदी असताना ही बोट गेलीच कशी आणि गुजरातची बोट इथे का आली, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. काही दिवसांपूर्वी अलिबागमध्ये अशीच घटना घडली होती. या बोट दुर्घटनेत तिघांचा मृत्यू झाला होता.



विलेपार्ले नागरिक विकास मंडळाची गणपती बाप्पाची पाच फूट मूर्ती साकारण्यात आली असून, गेल्या ४१ वर्षांपासून गणेशोत्सव साजरा करत असलेले हे मंडळ सोमवारी सकाळी आपल्या लाडक्या बाप्पाची आगमन मिरवणूक मोठ्या थाटात काढणार आहेत.

# पिंपरी-चिंचवडमध्ये मास्क मॅनची दहशत

■ पिंपरी

**पिंपरी-चिंचवडमध्ये** मास्क मॅन म्हणून ओळखला जाणारा एक अज्ञात व्यक्ती भरदिवसा हातात धारदार शस्त्र घेऊन रस्त्यावर फिरत आहे. निगडी परिसरात बजाज ऑटोमोबाईलसमोरील एचपी पेट्रोल पंपाजवळ नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष अनुभव आला. नागरिकांनी या मास्क मॅनचा व्हिडिओ काढला असून, तो सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. चेहऱ्यावर मास्क घालून ओळख लपवणारा हा व्यक्ती चाकू घेऊन रस्त्यावरून फिरत असल्याचे व्हिडिओत दिसते. यामुळे नागरिकांमध्ये मास्क मॅनची दहशत पसरली आहे.

# काँग्रेस पक्ष नोंदणी रद्द करण्याची सुप्रीम कोर्टात जनहित याचिका



■ नवी दिल्ली

**काँग्रेसची** राजकीय पक्ष म्हणून नोंदणी रद्द करण्याची मागणी करणारी जनहित याचिका अखिल भारतीय हिंदू महासभेचे माजी उपाध्यक्ष सतिशकुमार अग्रवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. त्याचबरोबर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाध्यक्ष खासदार मल्लिकार्जुन खरगे यांची निवडणूक आयोगाविरोधात सुरू केलेल्या मतचोरी मोहिमेची चौकशी करण्याचीही मागणी केली.

ॲड. अभिषेक यांच्यामार्फत दाखल केलेल्या याचिकेत नमूद केले की, काँग्रेसने पक्ष नोंदणीच्या वेळी संविधानाशी निष्ठा राखण्याची शपथ घेतली होती. मात्र सध्या पक्षनेते ज्या प्रकारे निवडणूक आयोगाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत त्यातून त्यांनी ही शपथ मोडली आहे. बिहारमधील विशेष मतदार यादी पुनरावलोकन प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना मतचोरी असा प्रचार करणे आणि निवडणूक आयोगावर केंद्र सरकारशी संगनमताचे आरोप करणे न्यायालयीन प्रक्रिया आणि संविधानाचा अपमान आहे. राहुल गांधी व मल्लिकार्जुन खरगे यांनी संसद सदस्य म्हणून घेतलेल्या शपथेचेही उल्लंघन केले आहे. काँग्रेस नेत्यांनी माध्यमांतून निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात असभ्य, असंसदीय भाषा वापरली आहे. बंगळुरू सेंट्रल लोकसभा मतदारसंघातील २०२४ च्या निवडणुकीदरम्यान झालेल्या मतदार यादीतील फेरफार प्रकरणाची चौकशी करण्यासाठी माजी न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली एसआयटी स्थापन करावी. काँग्रेस खासदार के. सी. वेणुगोपाल हेही या प्रकरणात याचिकाकर्ता आहेत.

# टाटा समूहाच्या एअर इंडियाला ९,५६८.४ कोटी रुपयांचा तोटा

## राज्यमंत्र्यांची माहिती

■ नवी दिल्ली

**टाटा** समूहाच्या मालकीच्या असलेल्या एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेस या दोन विमान कंपन्यांना मार्च २०२५ मध्ये संपलेल्या आर्थिक वर्षात एकूण ९,५६८.४ कोटी रुपयांचा करपूर्व तोटा झाला आहे, अशी माहिती नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

केंद्रीयमंत्री मोहोळ यांनी लोकसभेत लेखी उत्तरात यासंदर्भातील आकडेवारी जाहीर केली. मोहोळ म्हणाले की,गेल्या आर्थिक वर्षात, अकासा एअर आणि स्पाईसजेटला १,९८३.४ कोटी रुपये आणि ५८.१ कोटी रुपयांचा करपूर्व तोटा झाला आहे, तर इंडिगोने ७,५८७.५ कोटी रुपयांचा करपूर्व नफा मिळवला आहे. मात्र हे तात्पुरते आकडे आहेत. टाटा समूहाच्या मालकीच्या एअर इंडियाला ३,८९०.२ कोटी रुपयांचा करपूर्व तोटा झाला आहे




तर त्यांची बजेट कंपनी एअर इंडिया एक्स्प्रेस, जी दीर्घकाळ नफ्यात होती, तिला २०२४-२५ मध्ये ५,६७८.२ कोटी रुपयांचा तोटा झाला आहे. तोट्यात चालणारी एअर इंडिया आणि नफा मिळवणारी एअर इंडिया एक्स्प्रेस जानेवारी २०२२ मध्ये टाटा समूहाने विकत घेतली. आकडेवारीनुसार, एअर इंडियाचे कर्ज २६,८७९.६ कोटी रुपये होते, तर इंडिगोचे कर्ज ६७,०८८.४ कोटी रुपयांवर पोहोचले. एअर इंडिया एक्स्प्रेसवर ६१७.५ कोटी रुपयांचे कर्ज होते. तर, अकासा एअरवर ७८.५ कोटी रुपयांचे कर्ज होते आणि स्पाईसजेटवर ८८६ कोटी रुपयांचे कर्ज होते. १९९४ मध्ये एअर कॉर्पोरेशन कायदा रद्द झाल्यानंतर भारतीय विमान वाहतूक क्षेत्र पूर्णपणे नियंत्रणमुक्त करण्यात आले आहे आता विमान कंपन्या त्यांचे आर्थिक आणि ऑपरेशनल निर्णय व्यावसायिक आधारावर स्वतंत्रपणे घेतात, ज्यामध्ये संसाधनांचे व्यवस्थापन आणि कर्ज पुनर्गठन यांचा समावेश आहे.

# मराठा समाज कार्यकर्त्यांनी आठवलेंचा ताफा अडवला

■ धाराशिव

**मराठा** आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभरात वातावरण तापलेले असताना, धाराशिव जिल्ह्यातील सारोळा गावात मराठा आंदोलकांनी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा ताफा अडवला. यावेळी त्यांनी मराठा आरक्षण आमच्या हक्काचे अशा घोषणा दिल्या. मराठा आंदोलकांनी आठवले यांना सांगितले की, मनोज जरांगे-पाटील यांना मुंबईत आंदोलनासाठी यायची वेळ येऊ देऊ नका. त्याआधीच आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावा. यावेळी त्यांनी आठवले यांना एक निवेदनही दिले. रामदास आठवले यांनी आंदोलकांचे म्हणणे ऐकून घेतले. निवेदनात मांडलेल्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचे आश्वासन दिले.

# आंजर्ले, वेळास किनाऱ्यांना जैवविविधता वारसास्थळ दर्जा

■ रत्नागिरी



**रत्नागिरी** जिल्ह्यातील दापोली तालुक्यात असलेल्या मौजे आंजर्ले आणि मंडणगड तालुक्यातील मौजे वेळास येथील समुद्रकिनाऱ्यांना जैवविविधता वारसा स्थळ म्हणून घोषित करण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हास्तरीय जैविक विविधता व्यवस्थापन समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

जिल्हाधिकारी सिंह म्हणाले की, जैवविविधता ही पर्यावरणीय सुरक्षा व मानवी कल्याणाशी निगडित आहे. वारसा स्थळ घोषित केल्यामुळे जैवविविधतेचा ऱ्हास रोखण्यास मदत होणार आहे. या दोन्ही ठिकाणी दरवर्षी ऑलिव्ह रिडले कासवांचे आगमन होते. त्यांच्या अंडी घालण्याच्या काळात स्थानिक स्वयंसेवक आणि पर्यावरणप्रेमी मोठ्या प्रमाणावर संरक्षण कार्यात सहभागी होतात. वेळास येथे कासव महोत्सवदेखील आयोजित केला जातो. त्यामुळे पर्यावरणीय पर्यटनाला चालना देतो. चिपळूणचे विभागीय वन अधिकाऱ्यांनी या बैठकीत जैवविविधतेचे महत्त्व अधोरेखित करत सादरीकरण केले. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही समितीच्या मंजुरीने तातडीने केली जाणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार पाच दिवस आधी होणार

■ मुंबई

**गणेशोत्सव** साजरा करताना सरकारी कर्मचारी, अधिकारी आणि निवृत्तीवेतनधारकांना आर्थिक अडचण येऊ नये यासाठी राज्य शासनाने कर्मचाऱ्यांना पाच दिवस आधी पगार देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची माहिती शासनाने परिपत्रकाद्वारे दिली.

तसेच एसटी कर्मचाऱ्यांचा पगारही याच दिवशी देण्यात येणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यासाठी आदेश देऊन, तत्काळ वित्त विभागाकडे फाईल सादर करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

यानुसार ऑगस्ट महिन्याचे वेतन, निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतन १ सप्टेंबरऐवजी २६ ऑगस्ट रोजी वितरित केले जाणार आहे. यासाठी काही नियमात तात्पुरत्या स्वरूपात शिथिल करण्यात येत असल्याचेही राज्य सरकारने स्पष्ट केले. या तरतुदी जिल्हा परिषद, मान्यता प्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्था, कृषी व अकृषि विद्यापीठे, तसेच संलग्न महाविद्यालयांचे अधिकारी - कर्मचारी, निवृत्तीवेतनधारक आणि निवृत्ती वेतनधारकांनाही लागू होणार आहेत.

# कराडमध्ये बोगस मतदान! काँग्रेसचा आंदोलनाचा इशारा

■ कराड

**कराड** दक्षिण विधानसभा मतदारसंघात तब्बल ४८ हजार बोगस मतदान झाल्याचा दावा काँग्रेसच्या ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी यांनी केला आहे. ही बोगस मतदार नोंदणी रद्द करावी आणि या प्रक्रियेत सहभागी व्यक्तींवर शिक्षापात्र गुन्हे दाखल करावेत, अन्यथा आम्ही जिल्हाभर तीव्र आंदोलन उभारू, असा इशारा भानुदास माळी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने प्रांताधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला.



या शिष्टमंडळात भानुदास माळी यांच्यासह नामदेव आप्पा पाटील, इंद्रजित चव्हाण, बबनराव पुजारी, प्रकाश काळे, शिवाजी गावडे, संजय तडाके, झाकीर पठाण, गजानन आवळकर, मुकेश मोहिते, आनंदराव गोडके यांच्यासह अन्य पदाधिकारी सहभागी झाले होते. भानुदास माळी यांनी निवेदनात म्हटले आहे की, कराड तालुक्यातील वाळवा, इस्लामपूर, शिराळा, कोरेगाव, पाटण व सातारा या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर बोगस मतदार नोंदणी झालेली असून, ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यामुळे लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचत आहे. आपण या प्रक्रियेत लक्ष घालून बोगस मतदार नोंदणी त्वरित रद्द करावी. या प्रक्रियेत सहभागी असलेल्या व्यक्तींवर शिक्षेस पात्र गुन्हे दाखल करावे. जेणेकरून लोकशाही प्रक्रियेची थट्टा करण्याची हिंमत कोणी करणार नाही. या गुन्हेगारांवर त्वरित गुन्हे दाखल करून शिक्षा करावी, अन्यथा आम्ही जिल्हाभर तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारू.

# पाऊस ओसरूनही शिराळ्यात ७ पूल अद्याप पाण्याखाली

■ शिराळा

**सांगली** जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात पावसाचा जोर कमी झाल्याने वारणा आणि मोरणा नद्यांना आलेला पूर ओसरू लागला आहे. नद्यांचे पाणी कमी होत असले तरी दोन्ही नद्यांवरील सात पूल अद्याप पाण्याखाली असल्याने आज वाहतूक ठप्प दिसत होती. दिवसांपासून बंद आहे. मागील चार दिवस चांदोली धरण आणि अभयारण्य परिसरात अतिवृष्टी सुरू होती. मात्र कालपासून पाऊस ओसरला आहे. काल ६२ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. चांदोली धरणातून होणारा विसर्ग १३ हजार क्युसेकवरून ५,६८१ क्युसेकपर्यंत कमी करण्यात आल्यामुळे वारणा नदीच्या पाण्याची पातळी घटत आहे.

तालुक्यातील प्रमुख मार्ग असलेले आरळा-शित्तूर, चरण-सोंडोली, बिळाशी-भेडसगाव, सागाव-सरुड, मांगले-काखे, शिंगटेवाडी-मांगले आणि मांगले-कांदे हे सर्व पूल अजूनही पाण्याखाली आहेत. त्यामुळे या मार्गांवरील वाहतूक गेल्या दोन


## वार्षिक सर्वसाधारण सभा

शिवसाईनाथ एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित सी. टी. एस. नं. १३६ (पार्ट), २ / १३६ (पार्ट), १०९ (पार्ट), ११० पार्ट ऑफ लोअर परेल डिव्हिजन, जी / साऊथ वॉर्ड, दैनिक शिवनेर मार्ग, मांजरेकर लेन, वरळी, मुंबई - ४०००१८ या संस्थेच्या सभासदांना या नोटीस अन्वये सुचित करण्यात येते की, संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि.०७/०९/२०२५ रोजी सकाळी ठिक १०.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत आयोजित केली आहे. ही सर्वसाधारण सभा **गणपतराव कदम मार्ग, म्युनिसिपल शाळा, सभागृह गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०००१३** येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर सभेस उपस्थित रहावे.

**- सभेपुढील विषय-**

१) सभेच्या अध्यक्षांची निवड करणे.
२) मागील दि. ०१/०५/२०२५ रोजी झालेल्या खास सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
३) सन २०२४-२०२५ या आर्थिक कालावधीचे लेखा परिक्षण जमा खर्च वाचून मंजूर करणे.
४) सन २०२५-२०२६ या आर्थिक कालावधीचे लेखा परिक्षण करणे करिता लेखापरिक्षकाची नेमणुक करणे व मेहनताना ठरविणे.
५ ) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सहकार क्षेत्र एस. आर. ए. चे प्रशासक मा. सन्नके साहेब यांनी संस्थेच्या ऑफिसच्या दप्तराच्या ताबापत्राचे वाचन करुन ते मंजूर करणे.
६) संस्थेच्या विकासकाकडून संस्थेच्या पुनर्विकास कामाचा वस्तुस्थितीचा आढावा घेणे.
७) संस्थेच्या विकासकाकडून थकीत, कमी प्रमाणातील ३९ महिन्याचे (प्रशासक यांनी एस. आर. ए. यांना भाडेसंदर्भात लेखी स्वरुपात सादर केलेले पत्र) घर भाडे व चालू वर्षाचे घर भाडे या विषयी चर्चा करणे.
८) सन २०२४ ते २०२५ पुरवणीद्वारे पात्र होणारे झोपडीधारक यांना सभासदत्व करण्याबाबत मॅनेजिंग कमिटीला अधिकार देण्याबाबत.
९) नविन पात्र सभासदांना सभासदत्व देणेबाबत.
१०) शिवसाईनाथ एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रारंभिक सर्व्हेमध्ये सर्वे क्र. ए / १९४ आणि ए / १९५ हे संस्थेचे अधिकृत कार्यालय म्हणून नमूद होते परंतु २०२२ साली बेकायदेशीररित्या व गैरमार्गाने सदर झोपडे (कार्यालय) हस्तांतरण करण्यात आले त्यावर चर्चा करणे.
११) सभेच्या अध्यक्ष्यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

स्थळ : मुंबई
दिनांक: २१/०८/२०२५

**( नरहरी ल. दासरी)**
**सचिव**

**टिप:** १) सभेमध्ये विषय क्र.०१ ते ११ घेतले जातील अन्यथा किमान ७ दिवस आधी प्रश्न किंवा तक्रार लेखी स्वरुपात सचिव यांना द्यावीत. अन्यथा त्यावर उत्तर दिले जाणार नाही.
२) सभेत केवळ पात्रताधारक व्यक्तीनेच उपस्थित रहावे. सभासदाच्या वतीने त्याच्या प्रतिनिधीस अगर त्यांच्याकडून मुखत्यारपत्र किंवा अधिकार पत्र धारण करणाऱ्यास सभेस उपस्थित राहता येणार नाही.
३) नियोजित वेळेत गणपूर्ती न झाल्यास सभा अर्धा तास तहकूब करुन ती सभा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेतली जाईल व या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.


# अलिबाग-वडखळ रस्ता खड्ड्यात स्थानिकांचा आंदोलनाचा इशारा

■ रायगड

**अलिबाग-वडखळ** या राष्ट्रीय महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे रस्त्याची चाळण झाली आहे. त्यामुळे अर्ध्या तासाचे अंतर पार करण्यासाठी वाहन चालक आणि प्रवाश्यांना दीड ते दोन तासांचा कालावधी लागत आहे. तरी प्रशासनाने तातडीने या रस्त्याची दुरुस्ती करावी, अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.



सुरुवातीला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे सोपविण्यात आला होता. मात्र चौपदरीकरण करताना लागणारा खर्च जास्त असल्याने या मार्गातून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने स्वारस्य काढून घेतले. त्यानंतर हा रस्ता आता राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. परंतु हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने, पाच वर्षे या मार्गाच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे सध्या या महामार्गाची अवस्था बिकट बनली आहे. वडखळ ते धरमतर, शहाबाज ते पेझारी, तिनविरा ते कार्लेखिंड आणि वाडगाव ते अलिबाग दरम्यान सध्या रस्त्याची मोठी वाताहत झाली आहे.

# बीडमध्ये प्रेमत्रिकोणातून होमगार्ड महिलेची हत्या

## चार जणांना घेतले ताब्यात

■ बीड

**बीडमध्ये** प्रेमाच्या त्रिकोणातून एका महिलेने आपल्या मैत्रिणीची हत्या केली. अयोध्या राहुल व्हरकटे (२६) असे मृत महिलेचे नाव आहे. ती गृहरक्षक दलात (होमगार्ड) कार्यरत होती. ती दोन दिवसांपासून बेपत्ता होती. मात्र, काल एका नाल्यात तिचा मृतदेह सापडला. चार वर्षांपूर्वी अयोध्याच्या पतीचा अपघातात मृत्यू झाला होता. त्यांना एक लहान मुलगी असून ती सध्या अयोध्येच्या सासरी राहते. अयोध्या काही महिन्यांपूर्वी होमगार्डमध्ये भरती झाली होती. ती बीड शहरातील अंबिका चौक परिसरात राहून पोलीस भरतीची तयारी करत होती.

यादरम्यान अयोध्याची एका महिलेसोबत ओळख झाली. वृदांवनी फरताळे, असे तिचे नाव आहे. तिचे एका तरुणासोबत प्रेमसंबंध होते. काही दिवसांनी त्याच तरुणाशी अयोध्याचीही ओळख झाली. त्यांच्यात जवळीक वाढल्याने महिला संतापली. या महिलेने मंगळवारी अयोध्याला आपल्या घरी बोलावून घेतले. यावेळी त्यांच्यात जोरदार वाद झाला. त्यातून महिलेने आपल्या मुलाच्या मदतीने अयोध्याचा गळा दाबून तिची हत्या केली. नंतर अयोध्याचा मृतदेह खोक्यात भरून तो दुचाकीने ५ किलोमीटर अंतरावरील खापरपांगरी परिसरातील नाल्यात फेकला. हा मृतदेह काल पोलिसांना मिळाला. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह जिल्हा रुग्णालयात पाठवला. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी ४ जणांना ताब्यात घेतले आहे. वृदांवनी हिला २५ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

